# १. पाठलाग

नेहमीसारखाच सकाळी जरा लवकरच फिरायला बाहेर पडलो. मुख्यरस्त्यात प्रचंड वेगाने शाळेची बस माझ्या समोरून निघून गेली व काही क्षणातच एक Rickshaw नेहमीच्या वेगापेक्षा जास्त अशी त्या बसचा पाठलाग करताना दिसली. Rickshaw तील व्यक्ती हात बाहेर काढून बसचालकाचे लक्ष वेधून घेत होती. एकंदर प्रकरणाचा उलगडा व्हायला वेळ लागला नाही. त्या गृहस्थाच्या मुलाची बस चूकली होती. बहुधा वेळेवर न उठल्यामुळे व त्यामुळेच हा पाठलाग सुरू होता. पुढे वळणावर बस थांबली व मुलगा चपळाईने बसमध्ये चढला.

पाठलाग / chase आपल्यासर्वांच्याच परिचयाचे हे शब्द आहेत. नाहीतरी लहानपणापासून आपण सर्वजण काय करत असतो. एक जीवघेणा पाठलाग. हल्लिंच्या स्पर्धेच्या युगात हा पाठलाग जरा वाढलेलाच आहे.

पाठलागाबरोबरच धास्तीने आपल्या मनात घर केलेले असते. आपण पाठलागात यशस्वी होऊ की नाही ?
आपला पाठलाग भौतिक व मानसिक असा दोन्ही पातळयांवर चालू असतो आणि मग ह्या पाठलागाचीच एक सवय होते व त्याच्या शिवाय आपल्याला करमतच नाही. लहानपणापासून अभ्यास, शाळा, शिकवणी ह्या रहाटगाडयात मोकळा वेळ धंदांसाठी, छंदासाठी , खेळण्यासाठी उरतच नाही.

मग उच्चशिक्षण, नोकरी व्यवसायातील ताणतणाव , लग्नानंतर करावी लागणारी तडजोड व मग मुलांची काळजी, तरूणपणीच साथीला आलेले म्हातारपणचे रोग असे हे विचित्र रहाटगाडगे. एक स्पर्धाच, पाठलाग, chase आणि मग तणावाचे व्यवस्थापन, जीवन जगण्याची कला याचे धडे गिरवण्याची वेळ येते. परंतु हेच धडे उच्चशिक्षणाबरोबर समजावले तर प्रश्न थोडा सोपा होईल का नाही ?

परंतु लक्षात कोण घेतो. आज स्पर्धा दोन्ही टोकांवर चालू आहे. वरील स्तरावर तर जास्तच आहे. आहे त्या पेक्षा वरचा स्तर गाठण्यासाठी भौतिकसुखाच्या पाठीमागची फरफट दिसतच नाही. तळागाळातील स्पर्धातर जगण्यासाठीच असते. नाहीतरी बळी तो कान पीळी हा जंगलचा कायदाच आहे आणि माणूस हा सुद्धा जनांवरांच्यापेक्षा वेगळा नाहीच.

आपण नाही का काय विचित्र माणूसप्राणी आहे असे म्हणतो!